# बाळाजी बाजीराव ऊर्फ

# नानासाहेब पेशवा

प्रा.ग.श्री.पुराणिक






# बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवा

## इसवीसन १७२१ ते १७६१

प्रा. श. श्री. पुराणिक

गंधर्व-वेद प्रकाशन
१२८६ सदाशिव पेठ,
चिमण्या गणपतीजवळ, पुणे ४११ ०३०

बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवा

© प्रा० श० श्री० पुराणिक

प्रथमावृत्ती : विजयादशमी, २१ ऑक्टोबर २००७

प्रकाशक
दीपक वसंत खाडिलकर
श्री गंधर्व वेद प्रकाशन
१२८६ सदाशिव पेठ
चिमण्या गणपतीजवळ
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी २४४९३५०२
भ्रमणध्वनी ९८२३१९०७३४

निर्मिती
प्रकाश वसंत खाडिलकर
चिंतामणी पब्लिशिंग हाऊस
१२८६ सदाशिव पेठ
चिमण्या गणपतीजवळ
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी २४४९३५०२
भ्रमणध्वनी ९४२२०८६०८४

अक्षररचना व मांडणी
प्रकाश बाळकृष्ण ढवळे

मुद्रितशोधक
विजय सरदेशपांडे

मुखपृष्ठ
मोहन थत्ते

मुद्रक
सचिन कुलकर्णी
एक्सेल प्रिंटिंग ॲण्ड पॅकेजिंग
१३१/५ एरंडवन
पुणे ४११ ०३८

मुखपृष्ठावरील छायाचित्र
श्रीदेवदेवेश्वर संस्थान, पर्वती आणि कोथरूड पुणे
अंतर्गत श्री सिद्धिविनायक मंदिर,
२१७० सदाशिव पेठ पुणे २,
दूरध्वनी २४३३६५१२
ह्यांच्या सौजन्याने

मूल्य २०० रुपये

प्रा० डॉ० वि० वि० पेशवे व सौ० सरस्वतीबाई पेशवे
श्री० कृष्णराव पेशवे व सौ० रमाबाई पेशवे
सौ० अदिती नितीन अत्रे
आणि
बाजीराव त्रिशताब्दी समितीचे सर्व सदस्य यांस

# अनुक्रमणिका


**प्रस्तावना**

बाळाजी बाजीराव ऊर्फ
नानासाहेब पेशव्याची कुळकथा .. १३
या ग्रंथाचे वैशिष्ट्य .................... १५
नवे चरित्र हवे .......................... १७
पेशव्याचे चरित्र
पेशव्यांनाच समर्पण ............... १९

**पूर्वार्ध**

नानासाहेबाच्या पेशवाईचा प्रारंभ ..... २३
आश्वासन की ललाटलेख? ........... २५
निजामाने तोंडाला पाने पुसली! ...... २७
अखेर माळव्याची सनद मिळविली ... ३०
कर्नाटक – बाजीरावाच्या
एक पाउल पुढे! ................... ३८
गुजरात–
'सरदारीने काम करावे!' ........ ४४
रघुजी भोसले : बंगाल –
वीस वर्षांच्या वैराचा गोड शेवट . ५०
नानासाहेब – ताराबाई संघर्ष :
पड खाऊन जिंकले! ............. ५८
नानासाहेबाचा मध्यमक्रम –
मीमांसा ............................ ६५
त्याची स्वभावसिद्ध प्रकृती ............ ७०
त्याची अष्टपैलू रसिकता .............. ७४
ते भाग्यवंताचे राउळ होते ............. ७७
तुळाजी आंगऱ्याचा उच्छेद ......... १०५
शिंदे आणि होळकर –
'गृहकलह बरा नव्हे' ........... ११३
वायव्येकडचा लांडगा आला! ...... ११९
पेला लागे ओठा ..................... १२४
परी दैव मारी सोटा! ................ १२५

**उत्तरार्ध**

एक उत्तरेला तर एक दक्षिणेला ..... १२९
स्वारीत पेशव्याने लक्ष घातले ...... १३३
भाऊ दिल्ली जिंकतो ................ १३३
अब्दाली म्हणतो तह करावा ........ १३४
भाऊही तहाला तयारच होता ....... १३५
पेशवाही अनुकूल होता .............. १३७
अखेर तह मोडला .................. १३७
नजीबानेही खोडा घातला ........... १३९
पेशव्याचा पूर्ण पाठिंबा .............. १४०
एक विलक्षण गोष्ट – पेशव्याने
कसलाही संबंध ठेवला नाही ... १४१
अब्दालीने पत्रे पकडली काय? ..... १४४
पानिपत संग्राम – पेशव्यांचे एकही
पत्र उपलब्ध नाही! ............. १४५
पेशवा उत्तरेकडे निघतो –
२२ ऑक्टोबर १७६० .......... १४६
आधी लगीन पेशव्याचे .............. १४६
शहाण्या पेशव्याचा वेडेपणा ......... १४७
व्यक्ती म्हणून दोषी नव्हे,
राज्यकर्ता म्हणून दोषी .......... १५२
नानासाहेबाची विकृत कामवासना –
मस्तानी प्रकरण ................. १५३
रघुवंशातला अग्निवर्ण व
पेशवाईतला नानासाहेब ......... १५४
बुडत्याचा पाय खोलात ............. १५५
बाला-जरठ विवाहाची
हेतुचिकित्सा ..................... १५६
पेशव्याचा खेळ झाला,
पण पोरीचा जीव गेला! ........ १५६
पेशव्याचे झपाट्याने उत्तरेकडे कूच . १५७

मुक्काम भेलसा – पेशव्याला
किंक्रांत भोवली .................. १५८
तरी पेशवा हिंमत हरला नाही! ..... १६०
पेशव्यांचा सरदारांवर राग –
शिंदे, होळकर, विंचूरकर ........ १६१
बऱ्हाणपूर –
नाना फडणवीसाची भेट ......... १६३
वाताचे झटके येऊ लागले .......... १६४
३ जून १७६१ –
पुण्यास पेशवा येतो ............. १६४
पुणे हेच पेशव्याचे स्मारक .......... १६५
पेशव्याचे अखेरचे दिवस ............ १६९
शेवटी 'ज्योत विझली' ............. १७०
मरतानाही शांती लाभली नाही ...... १७१
भाऊचेच नाव काय म्हणून आले? . १७१
नानासाहेबाचे भाऊसाहेबाशी संबंध १७२
दोन पोरक्या भावांचे संगोपन ....... १७२
नवऱ्यापेक्षा बायकोच वरचढ! ...... १७४
जन्मदुर्दैवी भाऊ ..................... १७५
शाहूने पेशव्याला दिलेली तराटणी .. १७५
पुण्याला आणले;
पण कामच दिले नाही .......... १७६
भाऊ कोल्हापूरचा पेशवा होतो! ... १७७
कर्नाटकात भाऊच्या मोहिमा ........ १७७
तरीही भाऊ पेशव्याच्या
नजरकैदेत ........................ १७८
पापाचे गुप्त प्रायश्चित्त :
परी अंतरी सर्वही साक्ष येते।... १७९
पेशव्याची पुरंदऱ्याला करूण पत्रे ... १८०
सारा संताप गोपिकाबाईवर –
'स्त्रीबुद्धिः प्रलयावहा।' ......... १८१
मराठीतला नानासाहेब पेशवा व
इंग्रजीतला जोनाथन स्विफ्ट.... १८२
सत्तापिपासा हा प्राणघातक
स्वभावदोष ....................... १८३
पेशव्याची सातारवर स्वारी ......... १८६
आता कूच कोल्हापूर राज्याकडे.... १८७
कोल्हापूर राज्य जप्तीत
आणण्याचा नीच डाव .......... १८७
मराठी दौलतीचे खांब
खिळखिळे केले! ................ १८९
जातीचा जळजळीत अभिमान! ..... १९२
सतीचा शाप खरा ठरला! .......... १९५
पूर्वजांची पापे वंशजांना
भोगावी लागतात ................ १९५
राजाचे पाप राष्ट्राला भोवले ......... १९७
पानिपतचा खलनायक नानासाहेब
पेशवा हाच आहे! ............... १९९
गुणांमुळे नियंता व दोषांमुळे मराठी
राज्याचा विनाशकर्ताही तोच! . २०२
ज्याचे कर्तव्य त्याला
केलेच पाहिजे! .................. २०४

## बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्याची कुळकथा

'बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्याची कुळकथा' ह्या शीर्षकाचा अर्थ, नानासाहेब पेशव्याच्या कुळाची म्हणजे घराण्याची कथा म्हणजे इतिहास नसून नानासाहेब पेशवे या ग्रंथाची कुळकथा म्हणजे निर्मितीचा इतिहास असा आहे, हे प्रथमच स्पष्ट करणे जरूर आहे. प्रथम नानासाहेब पेशव्याचे स्वतंत्र चरित्र लिहिण्याचा माझा विचार नव्हता. 'पेशवा पहिला बाजीराव पूर्वार्ध व उत्तरार्ध' या ग्रंथाचे काम संपल्यावर मी 'पानिपत-एक महाभारत' हा ग्रंथ लिहिण्यास इसवी सन १९९१ च्या ऑगस्टमध्ये प्रारंभ केला व तो इतर अनेक ग्रंथांचे लेखन व इतर व्यवधाने यांना तोंड देत इसवी सन २००३ च्या एप्रिलमध्ये बारा वर्षांनंतर का होईना पण पूर्ण केला. तो अद्यापि प्रसिद्ध झालेला नाही. याची इतर कारणे काहीही असली तरी त्या ग्रंथाचा इसवी सन १७६१ ते इसवी सन १७९२ पर्यंतचा विस्तार व त्यासाठी खर्ची पडलेली तीन हजार हस्तलिखिताची पाने हे फार मोठे कारण होते. एवढे थोरले बाड नुसते पाहण्याचेही धाडस करणारा प्रकाशक आजच्या काळात पाहायलासुद्धा मिळणे दुरापास्त आहे. त्यामुळे नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे ती कागदाची ऐतिहासिक बंडले मी बांधली आणि एका पस्तीस वर्षांच्या ऐतिहासिक ट्रंकेत त्याची स्थापना केली व समाधानाचा सुस्कारा सोडला की, तेवढीच खोलीतली रद्दीची अडगळ दूर झाली. आणि मग मी आणखी नवी व तितकीच वजनदार रद्दी निर्माण करण्याच्या कामाला उत्साहाने लागलो. ती रद्दी म्हणजे इसवी सन १९७२ साली मी 'बाळ गंगाधर टिळक' हा ग्रंथ लिहिला होता. तीस वर्षांत टिळकांवर प्रचंड नवे लेखन झाले होते, त्याचा परामर्श घेऊन त्या चरित्राचे परिष्करण व पुनर्लेखन करणे.

हे काम चालू असताना माझा श्री० वि० सहस्रबुद्धे यांच्याशी घनिष्ठ परिचय झाला. ते मूळ सांगलीचे असले व पुणेकर म्हणण्यापेक्षा सांगलीकर म्हणवून घेण्यात त्याना अधिक अभिमान वाटत असला तरी आज वीस वर्षे पुण्यात ते राहत असल्यामुळे पुण्याचे झाले आहेत. ते पुण्याचे अनिवासी सांगलीकर आहेत असे म्हटले तरी चालेल. केसरी संस्था, मसाप, भारत इतिहास संशोधन मंडळ इत्यादी संस्थांत त्यांचा वाचनाच्या व्यसनामुळे अखंड राबता असतो. त्यानी मला केसरीतले टिळकांचे अनेक अप्रसिद्ध लेख झेरॉक्स करून घेण्यास फार मदत

केली. त्यांच्याशी इतिहासाबद्दल बोलत असताना मी माझ्या पानिपत ग्रंथाबद्दलही कधी कधी बोलत असे. वस्तुतः मी कधी काळी पानिपत ग्रंथ लिहिला होता हे मी विसरूनही गेलो होतो व सहस्रबुद्धेही ती गोष्ट विसरून गेले असतील असेच मी समजत होतो; पण असल्या साहित्यिक बाबतीत सहस्रबुद्ध्यांची स्मृती, त्यांचे उपनाम सार्थ ठरवण्याइतकीच फार तीक्ष्ण व तल्लख आहे. ते अशा गोष्टी कधी विसरत नाहीत. त्या बाबतीत ते फार चांगल्या अर्थाने खुनशी आहेत. माझ्या ध्यानीमनी नसताना एके दिवशी दुपारी ते त्यांचे प्रकाशक मित्र 'श्री गंधर्व वेद प्रकाशना'चे श्री. दीपक खाडिलकर यांना घेऊन आले व 'प्रकाशनाच्या दृष्टीने या माझ्या स्नेह्यांची तुमचे पानिपत ग्रंथाचे हस्तलिखित पाहण्याची इच्छा आहे,' असे ते म्हणाले.

सहस्रबुद्ध्यांची ती आकाशवाणी ऐकल्यावर टकलावर भला मोठा नारळ पडावा, तसा मी केवळ स्तंभित झालो. त्या वेड्या धाडसापासून परावृत्त करण्याचा मी फार आग्रह केला व त्यांना म्हटले, "माझे हे पुस्तक प्रकाशित व्हावे असे मलाही फार वाटते; पण माझे 'पानिपत' प्रसिद्ध करताना तुमच्या प्रकाशन व्यवसायाचे 'पानिपत' व्हावे असे मला वाटत नाही." पण ते ऐकेचनात. मी पुन्हा म्हटले, "अहो, ती बंडले आपल्या हाती लागण्यासारखी नाहीत. उंच माळ्यावर एका जीर्ण ट्रंकेत ती टाकलेली आहेत. उंच माणसाला मिळण्यासारख्या फळासाठी वामनमूर्तीने हात वर करावेत, त्याप्रमाणे तेथपर्यंत माझे हात पोचू शकत नाहीत." त्यावर सहस्रबुद्धे व खाडिलकर म्हणाले की, आम्ही ती बंडले खाली काढतो. ते दोघे उंच स्टुलावर व टेबलावर चढले व ट्रंक उघडून टेकडीवर दगड-गोटे गडगडत पडावेत त्याप्रमाणे त्यांनी धडाधडा ती बंडले खाली फरशीवर टाकली. खाडिलकर म्हणाले की, ही सर्व बंडले आताच मी नेत नाही. सुरुवातीचे हे मोठे बंडल 'कळसाध्याय' नेतो व ते वाचून पुढे काम करायचे की नाही, हे तुम्हाला कळवतो.

यथावकाश खाडिलकर व सहस्रबुद्धे दोघेही आमच्या घरी आले. त्यांची नावे ऐकल्यापासूनच मला त्या दोघांबद्दल फार आदर वाटत असे. कारण ही दोन्ही नावे मराठी साहित्यविश्वात फार प्रसिद्ध आहेत. खाडिलकर म्हणजे नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर ऊर्फ काकासाहेब खाडिलकर व सहस्रबुद्धे म्हणजे मराठीतले थोर विचारवंत प्रा० डॉ० पु० ग० सहस्रबुद्धे. खाडिलकर म्हणाले, "हा कळसाध्यायचा भाग स्वतंत्र ग्रंथ म्हणून प्रसिद्ध करावा असे मला वाटते. कारण यात नानासाहेब पेशव्यांचे १७४० पासून १७६१ पर्यंतचे सर्व चरित्र आले आहे.

त्याच्या पुढचा त्यांच्या मृत्यूपर्यंतचा भाग तुम्ही लिहून द्या म्हणजे हे नानासाहेब पेशव्यांचे चरित्र पूर्ण होईल व स्वतंत्र ग्रंथ म्हणून ते प्रसिद्ध करता येईल आणि ते फार मोठेही होणार नाही." (हे महत्त्वाचे होते.) त्यांची सूचना मला पसंत पडली. कारण नानासाहेबाचे उत्तरचरित्र, अनेक ठिकाणी विखुरलेले मी वाचले होते. त्याचे अनेक संदर्भ माझ्या नजरेखालून गेले होते. त्याची मूल्यमापने मी वाचली होती. माझे स्वतःचे निश्चित असे मूल्यमापन मी मनाशी बसविले होते. गेली चाळीस वर्षे मराठ्यांच्या इतिहासाचे वाचन मी करीतच आलो होतो. त्यामुळे खाडिलकरांची सूचना कार्यवाहीत आणणे मला कठीण गेले नाही. 'कळसाध्याय' हा शब्द नानासाहेबाच्याच कारकिर्दीला उद्देशून आहे. कारण त्यांच्या कारकिर्दीत त्यांच्या व त्यांच्या मराठी राज्यातल्या भाग्याचा कळस झाला. तो पूर्वार्ध व त्याच्या-नंतरचा त्याच्या मृत्यूपर्यंतचा व मूल्यमापनाचा भाग हा उत्तरार्ध अशी रचना मी केली व 'बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे' हा ग्रंथ पूर्ण केला. हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचेच नव्हे, तर त्याची कल्पना सुचवण्याचे सुद्धा श्रेय खाडिलकरांचे व सहस्रबुद्ध्यांचे आहे, माझे नाही ही गोष्ट लक्षात घेऊन त्या दोघांचे मी आभार मानतो व वाचकांनीही त्या दोघांचेच आभार मानावेत अशी माझी त्यांना विनंती आहे.

## या ग्रंथाचे वैशिष्ट्य

ह्या ग्रंथाचे वैशिष्ट्य प्रथम सांगतो. वैशिष्ट्य म्हणजे वेगळेपण हा शब्द मी मुद्दामच वापरतो आहे. महत्त्व किंवा मोठेपणा हा शब्द वापरत नाही. हा ग्रंथ लहान आहे की महान आहे, मोठा आहे की छोटा आहे, हे वाचकांनी ठरवायचे आहे, लेखकाने नव्हे. वैशिष्ट्य मात्र मी सांगू शकतो. ते असे की इसवी सन १९२६ साली म्हणजे ऐंशी वर्षांपूर्वी रियासतकार सरदेसायांचे 'नानासाहेब पेशवे' हे चरित्र प्रसिद्ध झाले. त्यानंतर ऐंशी वर्षांनंतर नानासाहेब पेशव्याचे हे प्रसिद्ध होत असलेले फक्त दुसरे चरित्र आहे. ह्या अवधीत पेशवाईतल्या अनेक स्त्री-पुरुषांची लहान-मोठी चरित्रे प्रसिद्ध झाली. उदाहरणार्थ 'बाळाजी विश्वनाथ' (म० श्री० दीक्षित), 'प्रतापी थोरले बाजीराव पेशवे' (ना० के० बेहेरे), 'थोरले माधवराव पेशवे' (स० अ० सहस्रबुद्धे), 'चिमाजी आप्पा' (कृ० वा० पुरंदरे, स० ह० जोशी) 'सदाशिवराव भाऊ' (वि० म० भुस्कुटे), 'राघोभरारी' (बा० रं० सुंठणकर), 'आनंदीबाई पेशवे' (चिं० ग० कर्वे), 'अखेरचा पेशवा' (डॉ० सुमंत वैद्य,

नागपूर), 'रघूजी भोसले' (प्रभाकर गद्रे आमगाव, नागपूर), 'सखाराम बापू' (य० ग० कानेटकर), 'बायजाबाई शिंदे' (दु० ब० पारसनीस), 'सखाराम हरि गुप्ते' बापू गोखले चरित्र व पत्रे, 'उमाजी नाईक', 'रामशास्त्री प्रभुणे' (सदाशिव आठवले) इत्यादी पण या सर्व चरित्रांच्या प्रभावळीत महादजी शिंदे, नाना फडणवीस व नानासाहेब पेशवे यांची चरित्रे प्रसिद्ध झालेली नाहीत. इसवी सन १८९२ साली वासुदेवशास्त्री खरे यांनी लिहिलेले 'नाना फडणविसाचे' चरित्र व त्याच सुमारास बेळगावचे नातू यांनी प्रसिद्ध केलेले 'महादजी शिंदे' याचे चरित्र सोडले तर नवे चरित्र प्रसिद्ध झालेले नाही. वस्तुतः या सर्वांच्या चरित्रांची साधने अफाट आहेत व ती उपलब्धही आहेत; पण ती अभ्यासून त्यांचे चरित्र लिहावे असे अद्याप तरी कुणाला वाटलेले नाही. अपवाद म्हणून नानासाहेब पेशव्याचे एक चरित्र सरदेसाई यांनी इसवी सन १९२६ साली लिहिले व त्यानंतर इसवी सन २००६ मध्ये मी लिहिले. ते आपणापुढे आहेच.

सरदेसायांच्या 'नानासाहेब पेशवे' या चरित्रापेक्षा माझे हे चरित्र चांगले व सरस आहे, असे मुळीच नाही, पण ते वेगळे मात्र निश्चित आहे. सरदेसायांच्या नावावर हे चरित्र प्रकाशक केशव भिकाजी ढवळे यांनी प्रसिद्ध केले असले तरी ते सरदेसायांनी लिहिलेले नाही. ते कसे लिहिले गेले याची कथा प्रस्तावनाकार त्र्यं० शं० शेजवलकर यानीच पुढे एका आठवणीत सांगितली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, प्रकाशकानी मागणी केली, तेव्हा सरदेसायांच्या हाती दुसरे काम होते. त्याना वेळ नव्हता व प्रकाशकानाही नाही म्हणावयाचे नव्हते. तेव्हा त्यानी त्यांचे निकटचे आप्तवासी शेजवलकराना, रियासतींमध्ये नानासाहेबाची माहिती आली होती, तीच एकत्र करायला सांगितली व अशा प्रकारे हे चरित्र तयार झाले. त्यामुळे त्या ग्रंथात जो एकसूत्रीपणा असावा लागतो तो आलेला नाही व आकृतिबंध नेटका साधलेला नाही. माहितीचा खजिना आहे पण त्यात सुसूत्रता नाही व विस्कळितपणा फार आहे. राजवाड्यांच्या शब्दांत तो विषय लेखकाच्या मनात दीर्घ चिंतनाने मुरलेला आहे असे वाटत नाही. तुलना म्हणून सरदेसायांचे 'पानिपत' हे प्रकरण वाचावे व मग शेजवलकरांचा 'पानिपत' हा ग्रंथ वाचावा. सरदेसायांच्या सर्व लेखनात हा विस्कळितपणाचा व सुसूत्रतेच्या अभावाचा दोष बऱ्याच प्रमाणात आढळतो, असे संशोधक य० न० केळकर यानी त्यांच्या रियासतींचा परामर्श घेताना 'रियासतीचा कळसाध्याय' या लेखात म्हटले आहे.

तो दोष मी लिहिलेल्या नानासाहेब पेशव्याच्या चरित्रात नाही असे माझे नम्र आणि प्रांजळ मत आहे. या ग्रंथाच्या विषयाचा व त्याच्या रचनेचा व या ग्रंथाच्या नायकाच्या गुणदोषांचा मी दीर्घकाळ विचार केला आहे. त्याबद्दल माझी निश्चित मते बनवली आहेत. ती बरोबर असतील किंवा चूक असतील, ती कोणाला रुचतील किंवा रुचणार नाहीत. तो महत्त्वाचा मुद्दा नाही. महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, ती माझी स्वतंत्र बुद्धीने निश्चित केलेली मते आहेत व ती साधार व सप्रमाण असण्याची दक्षता मी घेतलेली आहे. त्यामुळे हा ग्रंथ हे संकलन किंवा कंथा किंवा गोधडी झालेली नसून तो एकसंध व सुसूत्र असलेला ग्रंथ (ग्रथनात् ग्रन्थः – जो घट्ट बांधलेला असतो तो ग्रंथ) झालेला आहे. ती कंथा नसून कथा झालेली आहे. एवढे श्रेय मला पुरेसे आहे. ग्रंथावर अभिप्राय देण्याचा अधिकार वाचकांना आहे व टीकाकारांनाही जरूर आहे; पण तितकाच तो अधिकार ग्रंथ निर्माण करणाऱ्या ग्रंथकारालाही अवश्य असतो. मूल कसे आहे हे ठरवण्याचा अधिकार शेजाऱ्यांना व लोकांना जसा असतो, तसा मुलाच्या आईला व बापालाही असतोच असतो. म्हणून अभिप्रायाबद्दल तात्यासाहेब केळकरानी एकदा म्हटलेले मार्मिक वचन पुन्हा सांगावेसे वाटते – 'मी आजपर्यंत शेकडो ग्रंथांवर अभिप्राय दिले; पण मौजेची गोष्ट अशी की, सर्वांत कमी अभिप्राय माझ्याच ग्रंथांवर आले. त्याची मी कधी अपेक्षाही करीत नाही. आपल्या बरोबरीचा तज्ज्ञ वाचक आपले पुस्तक वाचून त्याच्यावर खुणा करून आवर्जून अभिप्राय देईल व कळवील ही आशाच करायला नको. सहजगत्या वाचक उत्स्फूर्तपणे जो अभिप्राय देतील तो खरा. मुद्दाम माझे पुस्तक तुम्हाला कसे वाटले असे विचारून 'बरे वाटले' असे त्यांच्याकडून बळेच वदवून घेणे हा काही खरा अभिप्राय नव्हे. मुद्दाम पंखा चालवून गार वारा घेण्यासारखे ते हीन प्रतीचे आहे. सहजगत्या आलेल्या गार वाऱ्याच्या गोड झुळुकेची गोडी त्याला नव्हे. आपले पुस्तक लिहिताना आपण श्रम किती घेतले हे आपले आपल्यालाच माहीत असते. त्यामुळे आपल्या पुस्तकावर आपण मनाने देऊ तोच अभिप्राय खरा.'

'एतेन सर्वे व्याख्याताः।' केळकरांच्या या शब्दात सारे आले.

## नवे चरित्र हवे

नानासाहेबाच्या चरित्राची साधने पुष्कळ आहेत, पण भरतीनंतर समुद्रातल्या वाळवंटावर विखुरलेल्या शिंपल्यांप्रमाणे व मोत्याप्रमाणे ती सर्वत्र पसरली आहेत.

रियासतीत त्याचे जीवनवृत्त पुष्कळच विश्वसनीय आलेले आहे. ते लिहिताना सरदेसायानी त्या वेळी उपलब्ध असलेल्या राजवाडे, खरे, पारसनीस इत्यादी संशोधकांच्या साधनांचा भरपूर उपयोग केला आहे, इतकेच नव्हे तर त्या समकालीन साधनातले उतारेही मुबलक देऊन त्या वेळचे जीवन वाचकांच्या डोळ्यांपुढे साक्षात उभे करण्याचा अत्यंत यशस्वी प्रयत्न केला आहे. त्यानंतर पेशव्यांचे ऋणानुबंधी सासवडचे पुरंदरे यांचे दप्तर त्यांच्याच आप्तवर्गातल्या कृ० वा० पुरंदऱ्यांनी 'पुरंदरे दप्तर' या नावाने तीन भागांत प्रसिद्ध केले. त्यात त्यांच्या मौलिक प्रस्तावनेबरोबरच पेशवे कुटुंबीयांच्या जीवनाचे अत्यंत बहुमोल तपशील अभ्यासकांना मिळतात. यानंतरचे नानासाहेबाच्या चरित्राचे मोठे साधन म्हटले म्हणजे सरदेसायांनी परिश्रमाने संपादित केलेले पेशवे दप्तरांचे पंचेचाळीस खंड होत. त्यापैकी १७/१८/२७/२८/२९/३४/४३ ह्या खंडात नानासाहेबाच्या जीवनाचे पुष्कळ तपशील मिळतात.

या साधनग्रंथाशिवाय प्रमोद ओक यांचा पेशवे घराण्याचा इतिहास हा पेशवे घराण्याचा अनिवार्य असलेला संदर्भ कोश महत्त्वाचा आहे. कोल्हापूरचे डॉ०जयसिंगराव पवार यांचा 'पेशव्यांच्या तडाख्यातून राज्य वाचविणारी करवीरकर महाराणी जीजाबाई' (मराठशाहीचा मागोवा) हा लेख मुद्दाम उल्लेख करण्यासारखा आहे. पांगारकरांचे 'मोरोपंत चरित्र व विवेचन' आणि 'चरित्र चंद्र' या आत्मचरित्रातील पेशवे व पाध्ये संबंधाची साधार माहिती, गो० कृ० मोडक यांच्या 'मुलांचा महाराष्ट्र' या ग्रंथाच्या परिशिष्टातली पेशवे व विठ्ठल सुंदर यांची आख्यायिका हेही संदर्भ उल्लेखनीय व महत्त्वाचे असेच आहेत. पिसुर्लेकरांचा 'पोर्तुगीज मराठे संबंध', शेजवलकरांच्या 'पानिपत' या ग्रंथाचेही महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. शेजवलकरांचा 'नानासाहेब पेशवे' हा प्रस्तावनापर लेख (शेजवलकर लेखसंग्रह, संपादक ह० वि० मोटे) व 'निजाम-पेशवे संबंध' यात नानासाहेबाच्या कर्तृत्वाची ऐतिहासिक मीमांसा आहे. 'पानिपतची बखर', 'भाऊसाहेबाची बखर' व 'पेशव्यांची बखर' हे ग्रंथ बखर असले तरी केवळ तेवढ्यासाठीच ते त्याज्य नव्हेत. कारण त्या बखरी समकालीन लेखकांनी लिहिलेल्या आहेत व त्यात पुष्कळच महत्त्वाची माहिती आली आहे. ना० वि० बापट यांची 'पानिपतची मोहीम', चिं० वि० वैद्य यांची 'दुर्दैवी रंगू' या कादंबऱ्या असल्या तरी त्यात इतिहास आला आहे व तो खरा आहे. तीच गोष्ट भाऊ श्रीधर कुलकर्णी यांच्या 'छत्रपती रामराजा' या कादंबरीची. मी

अभ्यासलेली नानासाहेबांच्या चरित्राची प्रामुख्याने साधने ही अशी आहेत. आणखीही आहेत व असतील. ती सर्व मी पाहिली आहेत असा दावा मी करू शकत नाही. कारण शब्दशास्त्राला मर्यादा नाही. आयुष्य थोडे, विघ्ने फार, त्यामुळे शहाणे लोक त्यातील सार तेवढे घेतात आणि फाफट पसारा टाकून देतात, अशा अर्थाचा जो संस्कृत श्लोक आहे, त्याप्रमाणे ही गोष्ट सर्व अभ्यासकांप्रमाणे माझ्याही बाबतीत खरी आहे.

या सर्व साधनांचा अभ्यास करून माझ्या चरित्रापेक्षा अगदी वेगळे किंबहुना सर्वस्वी विरोधी दृष्टिकोन साधार व सप्रमाण मांडणारे व नानासाहेब पेशव्याची उज्ज्वल व्यक्तिरेखा निर्माण करणारे चरित्र लिहिणाऱ्या प्रतिभासंपन्न चरित्रकाराची मी वाट पाहात आहे. त्याने माझी सर्व मते खोडून काढावीत व मला चूक ठरवावे हाच आनंद मला आहे. कारण, सर्व शास्त्राप्रमाणे इतिहासाच्या शास्त्रालाही पुढील अभ्यासकांनी पूर्वीच्या अभ्यासकांचा चांगल्या अर्थाने 'पराभव' करून त्यांना 'चूक' ठरवणे हीच स्पृहणीय गोष्ट आहे, इतिहासाची प्रगतीही त्यातच आहे. कारण महत्त्व व्यक्तीचे नसून इतिहासाचे आहे.

## पेशव्याचे चरित्र पेशव्यांनाच समर्पण

हे नानासाहेब पेशव्यांचे चरित्र मी पेशवे कुळातलेच प्रा० डॉ० वि० वि० पेशवा, त्यांचे बंधू कृष्णराव पेशवा, त्यांच्या सौभाग्यवती व त्यांची सुकन्या अदिती अत्रे या पेशवे कुटुंबीयांना अर्पण करीत आहे. इसवी सन१९८६ साली मी 'पेशवा पहिला बाजीराव' हा ग्रंथ लिहिला व इसवी सन १९९९ मध्ये मुकुंदराव दाते यांनी त्याचा पहिला भाग प्रसिद्ध केला. योगायोग असा की त्याच वर्षी पेशवे मंडळींनी 'श्रीमंत बाजीराव पेशवे जन्म त्रिशताब्दी समिती' स्थापन केली व प्र० के० घाणेकर यांच्या शिफारशीने मला त्यांनी त्या समितीत समाविष्ट केले. हा पेशवे मंडळींचा व माझा पहिला परिचय होय. त्यापूर्वी त्यांच्या श्री देवदेवेश्वर संस्थान, पर्वती आणि कोथरूड, पुणे यांच्यातर्फे सासवडला 'बाळाजी विश्वनाथ' व मृत्युंजयेश्वर मंदिरात 'महाभारतातील श्रीकृष्ण' व फडके स्नेहवर्धिनीतर्फे 'सरदार हरिपंत फडके' यांच्यावर माझी व्याख्याने त्यांनी केली होती; पण बाजीराव समितीतर्फे बाजीरावाचे जन्मस्थान 'डुबेर', त्याचे विवाहस्थान कल्याण, येथे त्यांनी मला बोलण्याची संधी दिली व वेदशास्त्रोत्तेजक सभेत 'पानिपत' या विषयावरही माझी व्याख्याने ठेवली. 'बाजीराव' लिहीत असताना

मी चाळीसगावच्या महाविद्यालयामध्ये प्राध्यापक होतो. त्या वेळी मला कल्पना नव्हती, की पेशव्यांच्या पुण्यात पेशव्यांच्या कुटुंबीयांकडून माझी पेशव्यांवर व्याख्याने होतील. पण योगायोगाच्या गोष्टी काही विलक्षण व अकल्पनीय असतात. ह्या प्रसंगामुळे माझा पेशवे कुटुंबीयांशी जवळून परिचय झाला व ज्या सुसंस्कृतपणाबद्दल व खानदानी रुबाबाबद्दल पेशवे कुळाची पूर्वीपासून प्रसिद्धी आहे, ती सुसंस्कृतांची सुसंस्कृती मला प्रत्यक्ष पाहायला मिळाली. गेल्या सात वर्षांतला माझा अनुभव हा असा आहे. पेशव्यांचा अभ्यास करताना व पेशव्यांवर बोलताना मी पेशव्यांचाच एक कुटुंबीय होऊन गेलो. त्या सर्वांनी ज्या अगत्याने व ज्या स्नेहाने आम्हा पती-पत्नीना वागवले, त्याचे स्मारक म्हणून त्यांच्याच कुळातल्या सुकीर्तिमान् नानासाहेब पेशव्याचे हे चरित्र मी त्यांना अर्पण करत आहे. ते त्यांनी गोड करून घ्यावे अशी पेशवे सरकारांच्या दरबारी नम्र अर्जी आहे.

या चरित्राचे जे राजवाडे, सरदेसाई, खरे, पगडी, ओक इत्यादी पूर्वसूरी आहेत त्यांचे आभार मानणे हे पितृतर्पणच आहे कारण ते सर्वच इतिहासकारांचे पितर आहेत. सहस्रबुद्धे व खाडिलकर यांचे सुरुवातीला मी आभार मानलेच आहेत, ते परत मानत नाही. कारण त्यांचे आभार मानणे म्हणजे माझे आभार मीच मानण्यासारखे आहेत.

# बाळाजी बाजीराव उर्फ
# नानासाहेब पेशवा



## पूर्वार्ध